नियमीत दिवाणी दावा नं. ५६/२०२१

नि.नं. ४० / क सोबत

प्रतिवादी तर्फे वकील बी. बी. घाटगे यांचे मार्फत साक्षीदार क्रमांक २ सुनिल चिंतामणी चव्हाण याचा उलट तपास सुरु

५. माझे शिक्षण १० वी पर्यंत झालले आहे. या प्रकरणातील वादी कोण हे मला सांगता येईल. मी हसुरचंपू येथे राहण्यास आहे. मला दोन मुले आहेत. माझ्या पत्नीचे नाव रोहीणी सुनिल चव्हाण आहे. तीच्या माहेरचे नाव रोहीणी परशराम कांबळे आहे. माझ्या सास-याचे नाव परशराम काशाप्पा कांबळे म्हणजेच प्रतिवादी नंबर २ आहे. सारंगला कोणी जमीन विकली हे मला माहित नाही. धनजय हा राहण्यास मुंबई येथे असतो. माझे सासरे परशराम हे पहिले गावचे पोलीस पाटील होते. परशराम हसुरचंपू येथे राहतो व धनजय मुंबई येथे राहतो. धनजयचे गावात घर आहे. परशराम ज्या घरात राहतो त्याच घरात धनजय राहतो. त्या दोघामध्ये कुठलेही वैमन्यष्य नाही. ते दोघे मिळून निर्णय घेतात. ही केस धनजयने का केली हे मला माहित नाही. सारंगला या प्रकरणात का पक्षकार केले याबद्दल मला माहिती नाही. दावा मिळकत काय आहे याबद्दल व सासरे किंवा धनजय यांना विचारले नाही. दावा मिळकत काय आहे याबद्दल मला माहिती नाही. जबाब बनवताना दावा मिळकत काय आहे याची मी माहिती दिली होती. "दावा मिळकत'' हा शब्द मला कळत नाही. "दावा मिळकत" ची माहिती असे म्हणून मी वकीलांना माहिती दिली नाही. गट नंबर ३८२ एक हेक्टर बारा आर चा वाद असल्याचे मी सांगीतले. त्या जमिनीच्या चतुःर्सिमा मला माहित नाही. जबाब करताना मी चतुःर्सिमा सांगीतलेल्या नाहीत. मी दावा मिळकतीचे उतारे बघीतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सारंगने गट नंबर ३८२ मध्ये तीन गुंठयामध्ये तारेचे

कुंपन घातलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी तिथे सामान आणून खड्डे खोदलेले आहेत. मी जबाब तयार करताना वकीलांना सारंगने जमीनीवर खड्डे खोदले आहेत व बांधकामाचे साहित्य आणले आहे असे सांगीतले नाही. माझ्या जबाबात वादग्रस्त जमिनीच्या चतुसिमा व बांधकामाच्या साहित्याची जुळवा जुळव केली हा मजकूर का लिहण्यात आला याचे कारण मी सांगू शकत नाही. परशराम यांना हळव्वा आई, दुंडाव्वा, जानवा या बहिणी होत्या.

६. गट नंबर ३८२ हे हसुरचंपू गावाला लागून आहे. गट नंबर ३८२ च्या आसपास घरे आहेत. गट नंबर ३८३ मध्ये घर आहे. ते घर कोणाचे आहे हे मला माहिती नाही. गट नंबर ३८३ हा आनंदा यल्लाप्पा कांबळेचे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, गट नंबर ३८३ मध्ये परशराम व धनजयचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ३८२ मध्ये दुंडव्वाचे घर आहे. गट नंबर ३८२ च्या उत्तरेस व पश्चिमेस रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या पश्चिम बाजूस घरे आहेत. तेथून गावठाणची जागा सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ३८२ ची जागा ही पडीक व खडकाळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नंबर ३८२ मध्ये धनंजय व परशरामच्या वेगवेगळया वहीवाटी आहेत. निशाण १९ सोबतचे अनुक्रमांक ६ ते ११ हे छायाचित्र खोटे आहेत. निशाणी ३ सोबत अनुक्रमिंाक ६ ते ९ वरील छायाचित्र दाखविण्यता आले ते देखील खोटे आहेत.

७. मला साक्षीदार म्हणून धनंजयने बोलविले. तो मला गावात बोलायला आला होता. धनजय ने मला काय साक्ष दयायचे हे सांगीतले नाही. वकीलांनी लेखी पुरावा दयायचे आहे असे मला सांगीतले. हे म्हणण खरे नाही की, माझा जबाब आदीच तयार करुन ठेवलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त मिळकतीत भुईमुग , भात , सोयाबीन, हे पिक होतात. वादग्रस्त मिळकत ही

सामाईकात उपभोगली जाते हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सास-याच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

जबाब समक्ष नोंदविला.

दिनांक ०७/०४/२०२५

सही/-

( श्री.न.श्री.पुरी )
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
गडहिंग्लज